# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

**दिनांक 28/03/2016 (दि.19/03/2016 ची तहकुब सभा का.प.क्र.14) रोजी**
**संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त.**

सोमवार दिनांक 28 मार्च 2016 रोजी (19/03/16 ची तहकूब सभा-का.प.क्र .14) मा.सभापती श्री.दिलीप गंगाधर थोरात यांचे अध्यक्षतेखाली महानगरपालिकेची स्थायी समितीची (अर्थसंकल्पीय)सभा महापालिका कार्यालयातील मलीक अंबर स्थायी समिती सभागृह येथे दुपारी 11-40 वा वंदेमातरम या गिताने सुरू झाली. सभेला मा.आयुक्त, नगरसचिव, श्री.दिलीप सुर्यवंशी व संबधीत अधिकारी तसेच खालील प्रमाणे स.सभासद उपस्थित होते.

01. स.स.श्री.गजानन रामकिशन बारवाल
02. स.स.श्री.मोहन धन्नुलाल मेघावाले
03. स.स.श्री.नितीन रमन चित्ते
04. स.स.श्री.रावसाहेब राधाकिसन आमले
05. स.स.श्री.कमलाकर शामराव जगताप
06. स.स.श्री.गजानन भानुदास मनगटे
07. स.स.श्री.मकरंद माधवराव कुलकर्णी
08. स.स.श्री.विकास प्रकाश एडके
09. स.स.श्रीमती कमल रामचंद्र नरोटे
10. स.स.श्रीमती ज्योती सुभाष पिंजरकर
11. स.स.श्री.खान इरशाद इब्राहीम
12. स.स.श्री.नाईकवाडी अब्दुल रहीम शेख
13. स.स.श्रीमती शेख समीना इलियास
14. स.स.श्रीमती ज्योती राजाराम मोरे
15. स.स.श्रीमती रेश्मा अशफाक कुरैशी

**विषय क्र. 54 :**

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 103 व 104 अन्वये मा.आयुक्त यांनी स्थायी समितीकडे सादर केलेल्या सन 2015-2016 चे सुधारीत व कलम 95 अन्वये सादर केलेल्या सन 2016-2017 या वर्षीचे मुळ जमा व खर्चाचे अंदाजपत्रकावर विचार विनिमय करणे.

श्री.बारवाल गजानन :आम्ही बरेचशी गोष्टी शहर विकासाच्या निमित्ताने नजरेस आणून दिल्या. स्पीलची कामे घ्यावी. नविन कामे घेण्यात यावीत.

श्री.नाईकवाडी अब्दुल :माझ्या प्रश्नाचे उत्तर देण्यात यावे.

श्री.संजय पवार (लेखाधिकारी) :महाराष्ट्र महानगरपालिका नियमान्वये 104 सुधारीत नियम सभागृहास वाचून दाखवतात. 595 कोटीचे बजेट सादर केलेले आहे.

मा.सभापती :प्रशासनाची चुक झालेली आहे. चुक ही प्रशासनाने मान्य केली आहे. आयुक्तांनी बजेट मध्ये सुधारणा बदल करण्याच्या अधिकार स्थायी समितीला आहे. असे मला सांगीतले त्यानुसार बजेट मध्ये सुधारणा/बदल करण्याच्या अधिकार स्थायी समितीचा आहे. त्याप्रमाणे आपण सुधारणा करू.

श्री.मनगटे गजानन :कामे कसे होतील? याचा खुलासा व्हावा.

| | |
|---|---|
| श्री.चित्ते नितीन | :10 कोटी वाढवले. 868 कोटीचे बजेट सादर करू. मागच्या वेळेस 600 कोटीचे बजेट दिले होते. 15 लाखाच्या तुकडा आम्हाला टाकण्यात आला. एका अधिकाऱ्याने खोडा घातला. त्यामुळे नगरसेवकांचे नाहीतर सामान्य जनतेचे नुक्सान झालेले आहे. बांधकाम 1313 पैकी 1179 मंजुरी दिल्या. परवानगी ले-आऊट आले 17 मंजुर केले 10 एमएसइबी ला शहरात किती मिटर दिले. यावरुन मालमत्तांची आपल्याला संख्या काढू शकते.<br>Permission Completion चे काम व्यावस्थेत झाले पाहिजे. टी.पी.ला 60 कोटीचे उद्दीष्ट देऊ नका. त्यांना 200 कोटीचे उद्दीष्ट द्या. सभापती महोदय आयुक्तांच्या माध्यमातून आपण ही बाब करावी. |
| श्रीमती समीना शेख | :टॉवरची टॅक्स वसुली करण्यात यावी. |
| मा.आयुक्त | :आपले Sources Powerful पाहिजे. टॅक्सची चांगली वसूली झाली आहे. Town Planning Review वाढला पाहिजे. |
| श्री.नाईकवाडी अब्दुल | :बजेट राजपत्रात प्रसिध्द केले होते का? 126 कलमानुसार करावे लागते असे माझे मत आहे. |
| श्री.संजय पवार (लेखाधिकारी) | :126 मुद्दा बजेटशी संबंधीत नाही. खर्चाच्या संबंधीत आहे. |
| मा.सभापती | :873 कोटीचे बजेट अंतिम केले होते. प्रशासन सुधारीत अंदाजपत्रक सादर केले होते. 595 कोटी मिळाले व ते खर्च केले. याचे उत्तर मिळेल. सन 2015-16 चर्चा केली आहे. मनपाविषयी नाराजी आहे. बजेट तयार करतांना नागरीकांच्या मुलभूत गरजांकडे लक्ष दिले पाहिजे.<br>सन 2016-17 मंजुर करत आहोत.<br>अर्थसंकल्पातील अंदाजपत्रके त्वरीत तयार करावी. शहर स्मार्ट सिटी कडे पुन्हा वाटचाल करत आहे. जवळपास 260 कोटीची कामांच्या आपण समाविष्ट केली आहे. |
| श्री.बारवाल गजानन | :10 कोटी वाढवावे. |
| श्री.चित्ते नितीन | :138 कि.मी. आपल्या शहराची आहे. सातारा-देवळाई समाविष्ट झाल्याने शहराची वाढ 150 Square कि.मी. होईल/झाली आहे.<br>बांधकाम परवानगी नव्याने दाखल झाल्या. यामध्ये मागील वर्षी शहरात 12000 घरे बांधण्यात आली आहेत. टी.पी.चे आपण ऑडीट करत नाही. दर आठवड्याला टी.पी.चे कामाबाबत मिटींग घ्यावी. |
| मा.सभापती | :या बाबत कार्यवाही करण्यात येईल. |
| श्री.नाईकवाडी अब्दुल | :शहरात अंदाजे 10 ते 15 हजार घरे बांधली जातात. अशी बांधलेली घरांना नोटीस देऊ. |
| मा.सभापती | :शासनाकडून 102 कोटी अनुदान प्राप्त करून घेवू. शहरात मोठी गृहप्रकल्प झालेले आहेत. अंदाजपत्रके, निविदा काढण्यात येईल. सर्वांच्या सहकार्यने बजेट मधील कामे त्वरीत सुरु करण्यात येईल. |
| श्री.चित्ते नितीन | :वसुली मनपाने करावी. समांतरल वसुलीचे काम घ्यायचे? 100 टक्के मनपाला पैसे मिळतील. |
| मा.सभापती | : सर्व स.सदस्य यांनी सन 2015-2016 चे सुधारीत व सन 2016-2017 चे मुळ प्रशासनाने सादर केलेल्या जमा व खर्चाच्या अंदाजावर अभ्यासपुर्वक सर्वंकष चर्चा केलेली आहे. सर्व स.सदस्यांच्या भावना लक्षात घेता व मागील वर्षी निधी अभावी |

विकासाची कामे अल्प प्रमाणात झालेली असल्यामुळे, नागरीकांची महानगरपालिके विरूध्द तसेच सर्व स.सदस्यांच्या प्रती असलेली नाराजी लक्षात घेता, या अर्थसंकल्पात केलेल्या तरतुदीनुसार स्थायी समिती सन 2016-2017 चा अर्थसंकल्प मंजूर करीत असतांना प्रशासनास आदेशित करीत आहे की, अर्थसंकल्पामधील कामांची त्वरीत अंदाजपत्रके तयार करून निविदा प्रक्रीया लवकरात लवकर पूर्ण करून विकास कामे हाती घेण्यात यावीत. तसेच आपले शहर दुसऱ्या टप्प्यात स्मार्ट सीटीच्या दिशेने वाटचाल करीत आहे. त्यामुळे शहरात विकासाची कामे काही प्रमाणात होतीलच, अशी आशा आहे. तसेच प्रशासनामार्फत मंजुर रेखाकंन व प्रो-पुअर बजेटमध्ये काही प्रमाणात कामांचा समावेश करण्यांत आला आहे. या सर्वांची सांगड घालत सर्व स.सदस्यांच्या मार्गदर्शनानेच स्थायी समितीच्या वतीने सर्व स.सदस्यांना त्यांच्या प्रभागात विकासाची कामे करण्यासाठी व शहराचा विस्तार लक्षात घेता या अर्थसंकल्पात जवळपास रू.260 कोटीची विकास कामे करण्याचा मानस आहे. तथापी सदर कामामधील काही कामे ही दिर्घ कालावधीची असल्यामुळे, या वर्षीच्या अर्थसंकल्पात पूर्णतः रक्कम खर्च होऊ शकणार नाही. त्यामुळे यावर्षीच्या अर्थसंकल्पावर जास्तीचा बोजा पडणार नाही.

प्रशासनाने सादर केलेल्या जमा बाजुच्या अंदाजामधील खालील बाबीमध्ये वाढ दर्शविण्यात येत आहे.

| | | |
|---|---|---|
| 01.स्थानिक संस्था कर | - 235 कोटी ऐवजी 260 कोटी | 25 कोटीची वाढ |
| 02.मालमत्ता कर | -230 कोटी ऐवजी 250 कोटी | 20 कोटींची वाढ |
| 03.नगर रचना विभाग | -60 कोटी ऐवजी 80 कोटी | 20 कोटींची वाढ |
| 04.इतर किरकोळ उत्पन्न | - | 10.50 कोटींची वाढ |
| 05.शासन अनुदान | -77 कोटी ऐवजी 102 कोटी | 25 कोटींची वाढ |

शासनाकडे प्रलंबीत व विशेष अनुदानाची मागणी करून अनुदान आणण्यात येईल. व शहर विकास कामांसाठी त्याचा उपयोग करण्यांत येईल. 102 कोटी अनुदान प्राप्त करून घेण्यासाठी मी युतीचे नेते, पदाधिकारी यांच्या सहकार्याने स्वतः शासनाकडे पाठपुरावा करील.

मालमत्ता कर वसुलीचे रिव्हीजन करून व नविन मालमत्तांचा शोध युध्द पातळीवर करून मालमत्ता कर वाढविण्याचे आदेशित करण्यांत येत आहे. तसेच शहरात मोठमोठे गृह प्रकल्पांना व बांधकाम परवानगी दिलेल्या शहरातील सर्व मालमत्तांना भोगवटा प्रमाणपत्र घेण्यासाठी प्रवृत्त करुन त्यामधुन मोठ्या प्रमाणावर महसूल प्राप्त करण्याचे नगररचना विभागास आदेशित करण्यांत येत आहे.

प्रशासनाने सादर केलेले एकुण उत्पन्न रू.777.74 कोटी मध्ये रू.100.50 कोटी वाढ करून रू.878 कोटी 24 लक्ष जमा व रू.878 कोटी 12 लक्ष खर्चाचे व रू.12.00 लक्ष शिलकीचे अंदाजपत्रकास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 96 नुसार सर्वानुमते मान्यता देण्यांत येते. तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 103 व 104 नुसार प्रशासनाने सादर केलेल्या सुधारीत अर्थसंकल्पास मान्यता देण्यांत येऊन महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 100 अन्वये अंतिम मान्यतेसाठी सर्वसाधारण सभेसमोर पाठविण्यास शिफारस करण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**ठराव :**

प्रशासनाने सादर केलेल्या जमा व खर्चाच्या मुळ अंदाजावर सर्व सन्माननीय सदस्य यांनी सर्वंकष अभ्यास करून चर्चा केली सर्व सदस्यांच्या भावना लक्षात घेता मागील वर्षी निधी अभावी विकासाची कामे अल्प प्रमाणात झालेली असल्यामुळे, नागरीकांची महानगरपालिके विरूध्द तसेच सर्व स.सदस्यांच्या प्रती असलेली नाराजी लक्षात घेता, या अर्थसंकल्पामध्ये सर्व समावेशक प्रभागात विकास कामे करण्याचा सर्व सदस्यांचा मोठ्या प्रमाणावर मानस आहे. तथापी महानगरपालिकेची आर्थिक स्थिती अत्यंत हलाखीची व नाजुक असुन सुध्दा वरील सर्व बाबींचा विचार करून सन्मानीय सदस्यांच्या वार्डामध्ये नागरी सुविधा पुरविण्याच्या भावनेतुन विकास कामे करण्यासाठी जमा व बाजुच्या अंदाजामध्ये वाढ सुचविण्यात येऊन देखभाल दुरूस्ती व विकास कामांचा समावेश अर्थसंकल्पामध्ये करण्यात आलेला आहे.

स्मार्ट सिटीच्या दुसऱ्या टप्प्यामध्ये महानगरपालिकेचा समावेश होण्याच्यादृष्टीने स्थानिक स्वराज्य संस्थेच्या कराची वसुली ची टक्केवारी 80% होणे आवश्यक आहे. यासाठी शहरातील नव्या मालमत्तेचा शोध घेणे, मालमत्ता कराच्या वसुलीमध्ये सुसुत्रता यावी व प्रभावीपणे वसुली करून महानगरपालिकेचे उत्पन्न वाढविण्यासाठी प्रशासनाने सर्व विभागातील कार्यरत कर्मचाऱ्यांचा आढावा घेऊन अनावश्यक कर्मचाऱ्यापैकी या दोन्ही विभागासाठी 25% वाढीव व आवश्यक कर्मचारी वर्ग उपलब्ध करून द्यावा.

मालमत्ता कराचे संगणकीकरण करण्यात आलेले आहे, त्यामुळे मालमत्ता धारकांना मागणी पत्रके एप्रिल-2016 अखेर वाटप करण्यात येऊन मालमत्ता कर वसुली उद्ष्टिानुसार करण्याचा प्रयत्न प्रशासनाने करावा.

गरीबाभिमुख (प्रोपुअर बजेट) झोपडपट्टी विकास कार्यक्रम, दलित वस्ती सुधार योजना, अल्पसंख्याक बहुल वसाहतींमध्ये नागरी सुविधा पुरविण्यासाठी शासन निर्देशानुसार तरतुद करण्यात आली आहे.

सदरील तरतुदीनुसार कामाचे नियोजन करून सहा प्रभागामध्ये कामे अंदाजपत्रकामध्ये समाविष्ट करण्यात आलेली आहे.

प्रशासनातर्फे महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 103 व 104 अन्वये सन 2015-16 चे सुधारीत अर्थसंकल्पीय जमा रू.570 कोटी 84 लक्ष 00 हजार यामध्ये प्रारंभीची शिल्लक 24 कोटी 84 लक्ष 27 हजार असे एकुण 595 कोटी 68 लक्ष 27 हजार व खर्च रू.595 कोटी 27 लक्ष 80 हजार विचारात घेऊन रू.40 लक्ष 47 हजार शिलकीच्या सुधारीत अर्थसंकल्पास सर्वानुमते मान्यता प्रदान करण्यात येते.

उपरोक्तनुसार प्रशासनाने सादर केलेल्या अर्थसंकल्पीय अंदाजामध्ये फेरफार, दुरूस्ती व वाढ करून सन 2016-2017 करीता महानगरपालिकेचे मुळ अंदाजपत्रक जमा रू.877 कोटी 84 लक्ष 00 हजार यामध्ये प्रारंभीची शिल्लक 21 लक्ष 52 हजार असे एकुण 878 कोटी 05 लक्ष 52 हजार जमा व खर्च रू.877 कोटी 98 लक्ष 44 हजार विचारात घेऊन रू.06 लक्ष 88 हजार शिलकीच्या अर्थसंकल्पास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 96 नुसार सर्वानुमते मान्यता देण्यात येते.

करीता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 103 व 104 नुसार सन 2015-2016 चे सुधारीत व सन 2016-2017 चे मुळ अर्थसंकल्प महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 100 अन्वये अंतिम मान्यतेसाठी मा.सर्वसाधारण सभेसमोर सादर करण्यात येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

याबरोबरच राष्ट्रगिताने संभा संपल्याचे मा.सभापती यांनी घोषित केले.

**(दिलीप सुर्यवंशी)**
नगर सचिव,
महानगरपालिका औरंगाबाद